# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

४ था मजला, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९ , खेरवाडी, वांद्रे (पुर्व), मुंबई- ४०० ०५१.

दू.क्र:०२२६२५४२-१००/१७०/१५४

email: secretary@msbte.com संकेत स्थळ :www.msbte.org.in


जा. क्र. मरातंशिमं/का-५०/ exit option/२०२४/ 4051 दिनांक : 11 JUL 2024

**वेब परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नित सर्व

अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम

राबविणाऱ्या संस्था.

विषय:- अभियांत्रिकी पदविका (K-scheme) अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष उत्तीर्ण केलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रम सोडण्याच्या (Exit) कार्यप्रणाली पर्यायाबाबत.

संदर्भ:- १) मंडळचे परिपत्रक जा. क्र. मरातंशिमं/D-५१/NEP२०२०/२०२४/२८५५, दि.३/०५/२०२४

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये Multi Entry Multy Exit( ME-ME) बाबत संबंधित सर्व संस्थांच्या प्रचार्यांना कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रथम वर्षानंतर Exit करावयाचे झाल्यास प्रथम वर्ष उत्तीर्ण होऊन ४० क्रेडिट प्राप्त करणे व ०४ आठवडयांचे Internship पूर्ण करणे अनिवार्य आहे.

त्याबाबतची कार्यप्रणाली खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

अ) विद्यार्थ्यांची अर्ज स्वीकृती व नोंदणी:-

१) सदर संधीचा लाभ घेण्याकरिता प्रथम वर्ष (K-scheme) उत्तीर्ण असलेल्या पात्र विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम निहाय यादी Institute Login मध्ये "K-Scheme Exit Option" या लिंक अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) इच्छुक विद्यार्थ्यांनी या परिपत्रकासोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात ( Proforma I) रु. १०००/- शुल्कासह संस्थेत विहीत वेळेत अर्ज सादर करावा. संस्थेने अर्ज स्वीकारुन संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध लिंक द्वारे नोंदणी करावी व स्वीकारलेला अर्ज Upload करुन विद्यार्थ्यांची नोंदणी निश्चित करावी.

३) संस्थेने सर्व अभ्यासक्रमातील एकत्रित अर्ज, संस्थाप्रमुखांचे पत्र व एकूण शुल्क मंडळाच्या विभागील कार्यालयात जमा करुन सर्व विद्यार्थ्यांची नोंदणी निश्चित करावी.

ब) विभागीय कार्यालयाने Exit पर्यायासाठी निश्चित (confirm) केलेल्या विद्यार्थ्यांच्या ०४ आठवडयांच्या आंतरतासिका (Inernship) बाबत कार्यवाही पुढीलप्रमाणे:-

१) संस्थेने नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची ०४ आठवड्याची Internship/ Industrial Training करण्याकरिता संबंधित संस्थेने औद्योगिक क्षेत्र ठरवावे व विद्यार्थ्याचे निश्चित केलेल्या औद्योगिक संस्थेत प्रशिक्षण पूर्ण करून घ्यावे.

२) औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण केल्याची माहिती उपलब्ध "Add Industrial Training Certificate" लिंक द्वारे Internship Certificate (Proforma II) upload करुन माहिती निश्चित करावी.

३) Industrial Training बाबत माहिती निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांचे गुणमुल्यांकन करून गुण भरण्याकरिता FA-PR व SA-PR च्या ई- मार्कशिट संस्थेच्या login मध्ये "Exit Option E-Marksheet" या लिंक द्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीप्रमाणे गुणपत्रिकेमध्ये गुणभरून निश्चित कराव्यात.

४) E-Marksheet निश्चित झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे "Certificate of Vocation" संस्थेच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. संस्थेने सदर प्रमाणपत्राची प्रिंट घेऊन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र द्यावे. सदर प्रमाणपत्र हेच अंतिम "Certificate of Vocation" प्रमाणपत्र असेल.

**महत्त्वाच्या सुचना:-**

१) ज्या विद्यार्थ्यांना सदर संधीचा लाभ घेऊन संस्था कायमची सोडायची असेल त्या विद्यार्थ्यांना संस्था सोडल्याचा दाखला (Leaving Certificate) देण्यात यावा. अशा विद्यार्थ्यांचा संस्थेतील प्रवेश अबाधित न राहता सदर प्रवेशावर पुनश्च उर्वरित पदविका अभ्यासक्रम पूर्ण करू शकणार नाही याची नोंद घ्यावी.

२) ज्या विद्यार्थ्यांनी Exit पर्याय निवडला आहे, अशा विद्यार्थ्यांचे पुढील परीक्षेपासून परीक्षा अर्ज मंडळाकडून थोपविण्यात येतील.

३) सदर Internship च्या FA-PR व SA-PR चे गुणमुल्यांकन Exit Internship या अभ्यासक्रमानुसार RUBRICS चा वापर करून गुणपत्रिकेत गुण भरण्यात यावे. सदर अभ्यासक्रम मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४) ME-ME या संधीचा लाभ घेऊन प्रथम वर्षानंतर बाहेर पडलेल्या विद्यार्थ्याने त्याच्यामुळे प्रवेशाच्या ०४ वर्षाच्या आत पुनश्च: पदविका अभ्यासक्रमात मंडळाच्या पूर्व मान्यतेने प्रवेश घेऊ शकतो. तसेच प्रथम वर्ष Exit केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रथमवर्ष मुळ प्रवेशाच्या दिनांकापासून कमाल ०७ वर्षे कालावधीमध्ये उर्वरित अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे सर्व सत्र पूर्ण करणे बंधनकारक राहील.

५) ME-ME बाबतचे विद्यार्थ्यांचे अर्ज व हमीपत्र (Proforma I), Internship Certificate (Proforma II), गुणमुल्यांकनाबाबतचे तसेच प्रदान करण्यात आलेल्या "Certificate of Vocation" बाबतचे सर्व दस्ताऐवज जतन करण्याची तसेच अकॅडेमिक मॉनिटरिंगच्या वेळेस सदर दस्ताऐवज समिती समोर सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीताचे Exit पर्याय प्रक्रिये बाबतचे सविस्तर वेळापत्रक

| अ.क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १) | संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज व हमीपत्र रु. १०००/- शुल्कासह विद्यार्थ्याकडून स्वीकारून संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध लिंकद्वारे विद्यार्थ्यांची नोंदणी करणे | दि.११ ते १९ जुलै २०२४ |
| २) | विभागीय कार्यालयाने संस्थेने निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांची एकत्रित यादी व एकूण शुल्क स्वीकारून नोंदणी निश्चित करणे. | दि. २२ जुलै २०२४ |
| ३) | विभागीय कार्यालयाने निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांचे औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण करून Internship Certificate संस्थेच्या Login मधून अपलोड करणे. | दि. २६ जुलै ते ०२ सप्टेंबर२०२४ |

| | | |
|---|---|---|
| ४) | विद्यार्थ्यांचे गुणामुल्यांकन करून FA-PR व SA-PR ई-मार्कशिटमध्ये गुण भरून निश्चित करणे | दि. ०२ ते ०५ सप्टेंबर२०२४ |
| ५) | "Certificate of Vocation" संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध करून देण्याचा कालावधी | दि. ०५ ते १० सप्टेंबर२०२४ |

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत: माहिती व कार्यवाहीकरीता:

१) उपसचिव, परिक्षा विभाग.

२) उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय मुंबई/पुणे/नागपूर/छत्रपती संभाजीनगर.

# PROFORMA – I

## प्रथम वर्षाअंती Exit करिता विद्यार्थ्यांकडून घ्यावयाचे अर्ज व हमीपत्र

मी ________________________________ Enrollment No__________ Diploma in ________________________________ या अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष पूर्णपणे उत्तीर्ण केले असून हा अभ्यासक्रम तात्पुरता / नेहमी करिता सोडू इच्छितो / इच्छिते कारण________________________________

________________________________

________________________________

मी याबाबत हमी देतो / देते कि,

मला याबाबत संस्था / विभागप्रमुखा कडून पुढीलप्रमाणे सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

१. सदर अभ्यासक्रम नेहमीकरिता सोडून जात असल्यासच मला संस्थेकडून Leaving Certificate दिले जाईल.

२. मी सदर अभ्यासक्रम तात्पुरता सोडू इच्छित असलो / असले तर मी सदर अभ्यासक्रमात सोडून जात असल्यापासून चार वर्षाच्या आत, फक्त शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीसच पुनःश्च प्रवेश घेऊ शकेल तसेच पुनःश्च प्रवेश घेतल्यास माझ्या प्रथम प्रवेशाच्या दिनांकापासून सात वर्षाच्या आत Diploma अभ्यासक्रम पुर्ण करावा लागेल.

३. मी प्रथम वर्ष पूर्णपणे उत्तीर्ण केले असून First Year Exit Scheme नुसार किमान ४ आठवड्याचे Internship पूर्ण करुन त्या संबंधित परिक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य आहे. त्यानंतरच मला Certificate of Vocation प्रदान करण्यात येईल.

४. हा अभ्यासक्रम वरिल अटींनुसार सोडावयाचा असल्यास पुढील येणा-या पहिल्या शैक्षणिक वर्षात मला प्रवेश घेता येणार नाही, याची जाणीव करुन देण्यात आली आहे.

दिनांकः

विद्यार्थ्यांचे नाव व स्वाक्षरी

---

**पालकांची सहमतीः माझ्या पाल्याचा अभ्यासक्रम सोडण्याच्या निर्णयाशी व वरील माहितीस मी पुर्णपणे सहमत आहे.**

पालकांचे नाव व स्वाक्षरी :

दिनांक

---

**प्राचार्यांचे हमीपत्र : वरील विध्यार्थी अभ्यासक्रम सोडू इच्छीत असल्याने त्याबाबतीतील नियमांची संपूर्ण कल्पना त्यास देण्यात आली असून त्यांच्या विनंतीनुसार प्रथम वर्ष Exit करिता शिफारस करण्यात येत आहे.**

प्राचार्यांची नाव व स्वाक्षरी:

दिनांक

संस्था कोडः

संस्थेचे नाव व शिक्का

## PROFORMA-II

# < Institute Letter Head>

## Certificate of Completion of Exit –Internship-I

This is to certify that Mr./Ms. ______________________________ with Enrollment No. ____________________________ has successfully completed Internship/Industrial Training in the field of ________________ from ______________________ to _________________________ for fulfillment towards completion of Exit Internship after first year for this programme, Diploma in ________________________ from the (Institute Name ) ___________________________________ with Institute code___________________.

Signature
Head of the Department

Seal of the Institute

Signature
Principal